दिनांक १८/०७/२०२४

## प्रेस नोट

मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक अपोमसं/प्रशिक्षण/पोशि भरती २०२२-२३/१७३/२०२३/९६६ दिनांक १६/७/२०२४ अन्वये सन २०२२-२०२३ पोलीस शिपाई भरतीमध्ये आर्थीक दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केलेल्या मराठा समाजाचे उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग अथवा खुल्या प्रवर्गात सामावून घेणे बाबत सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

मराठा समाजातील उमेदवारांनी आर्थीक दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांना कार्यालयात बोलावून त्यांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गाऐवजी त्यांना सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग (SEBC), व इतर मागास वर्ग (OBC), व खुला प्रवर्ग (OPEN) या तीनपैकी एका प्रवर्गाचा फायदा अनुज्ञेय ठरतो ही बाब समजावून सांगावी व त्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) / इतर मागास वर्ग (OBC), व खुला प्रवर्ग (OPEN) या तीनपैकी एका प्रवर्गाची निवड करुन त्याबाबतचे हमीपत्र त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे व निवड केलेल्या प्रवर्गाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ०१ महिन्याची मुदत द्यावी **व** ते प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांना गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातून निवड द्यावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील प्रस्तुत सूचना प्रमाणे आर्थीक दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केलेल्या मराठा समाजाचे उमेदवार यांनी वरील प्रमाणे हमीपत्र भरुन देणेसाठी **दिनांक १९/७/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. भरती कक्ष, आस्थापना शाखा, पोलीस अधीक्षक, कार्यालय बीड** येथे न चुकता हजर राहावे. आर्थीक दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केलेल्या मराठा समाजाचे उमेदवार हमीपत्र भरुन देणेसाठी हजर न राहिल्यास त्यांचा (EWS) या प्रवर्गातून दावा ग्राहय धरण्यात येणार नाही.

**(नंदकुमार ठाकूर )**
पोलीस अधीक्षक,बीड.